# श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.

## SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE,YAVATMAL

PHONE NO.07232-242456, FAX No.07232-244148 email- deanvngmcstudentsection@rediffmail.com


जा क्र श्रीवनाशावैमय/विवि/पीजी/जाहिरात/ ६३६९ /२०१७ दिनांक :-०८/०६/२०१७

# जाहिरात

विषय :- वरिष्ठ निवासीची पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत.

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ येथील खालील दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ निवासीची पदे तात्पुरत्या स्वरुपात / शासनाकडून सुचना प्राप्त होई पर्यन्त ( नियमित स्वरुपात नाही ) भरण्याकरीता उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी महाविद्यालयातील विद्यार्थी विभागात आवश्यक प्रमाणपत्रासह अर्ज भरुन जमा करावा.

| अ क्र | विभागाचे नांव | आरक्षण | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.जा | अ. ज | विजा | भज-१ | भज-२ | भज-3 | इमाव | खुला | |
| १ | शल्यचिकित्साशास्त्र | १ | --- | --- | १ | --- | --- | १ | २+१* | ६ |
| २ | बधिरीकरणशास्त्र | १ | --- | १ | --- | --- | --- | १* | २ | ५ |
| ३ | कान नाक घसाशास्त्र | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | १* | २ |
| ४ | नेत्रचिकित्साशास्त्र | --- | १* | --- | --- | --- | --- | --- | १ | २ |
| ५ | औषधवैद्यकशास्त्र | १ | --- | --- | --- | १* | | १ | २+१* | ६ |
| ६ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | १ | --- | --- | --- | --- | --- | १ | २+१* | ५ |
| ७ | क्षयरोगशास्त्र | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | १ |
| ८ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | --- | १ | --- | --- | --- | --- | १* | १ | 3 |
| ९ | मनोविकृतीशास्त्र | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | १ | १ |
| १० | बालरोगशास्त्र | १* | --- | --- | --- | --- | १ | --- | १ | 3 |
| ११ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | --- | १* | --- | --- | --- | --- | --- | १ | २ |
| १२ | क्ष-किरणशास्त्र | १ | --- | --- | --- | --- | --- | १* | १ | 3 |
| | एकूण | ६ | 3 | १ | १ | १ | १ | ७ | १९ | ३९ |

शैक्षणीक अर्हता:-

- मान्यता प्राप्त विद्यापीठाची मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी व ज्या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे, त्या विषयात निवासी म्हणुन ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.
- संबंधित विषयात डी.एन.बी. उत्तीर्ण असणे आवश्यक .

किंवा

- मान्यता प्राप्त विद्यापीठाची मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवीका उत्तीर्ण असल्यास त्याच विषयात १ वर्षाचा निवासी पदाचा अनुभव आवश्यक.

किंवा

- मान्यता प्राप्त विद्यापीठाची मान्ता प्राप्त एमबीबीएस पदवीधारक व आय एम आर नोंदणी केलेली असून संबंधीत विषयातील ३ वर्षाचा निवासी पदाचा अनुभव आवश्यक.

- विद्यावेतन:- सदर पदाना रु २५०००/- मुळ वेतन व त्यावरील प्रचलित दराने देय होणारा महागाई भत्ता असे मानधन/ठोक रक्कम अनुज्ञेय राहिल.
- * असलेल्या जागा ३०% महिला कोटा राखीव ठेवण्यात आलेला आहे.
- १९/०६/२०१७ च्या पुढील कार्यरत वरीष्ठ निवासी यांचे आदेश रदद समजण्यात येतील.
- अर्ज स्विकृतीची अंतीम तारीख:- दि ०७/०६/२०१७ ते १६/०६/२०१७ कार्यालयीन वेळेत सायं ५.०० वाजेपर्यन्त.
- मुलाखतीची तारीख :- १९/०६/२०१७.
- मुलाखतीचे ठिकाण :- मा अधिष्ठाता यांचे सभागृह.
- वयोमर्यादा:- मुलाखतीच्या दिवशी खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.
- वरीष्ठ निवासी पदांसाठी अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे.
  १. अंतीम एमबीबीएस गुणपत्रीका, पदवी प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र
  २. पदव्युत्तर पदवी/पदवीका गुणपत्रीका, पदवी प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र
  ३. एमबीबीएस व पदव्युत्तर पदवी / पदवीकाचे महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र.
  ४. बंधपत्र प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र
  ५. मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
  ६. VJ,NT-1,NT-2,NT-3, OBC व SBC साठी चालुवर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आवश्यक.
  ७. जन्म दिनांकासाठी एसएससी प्रमाणपत्र
  ८. MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र
- रिसर्च पेपर राष्ट्रिय किवा इंडेक्समध्ये प्रसिध्द झालेले असल्यास त्याचा तपशील.
- <u>नियम व अटी.</u>
  १. श्री व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या विभाग प्रमुखामार्फत अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.
  २. विहीत नमुण्यातील अर्ज उमेदवारानेच प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे.
  ३. पोस्टाने अथवा अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
  ४. मुलाखतीसाठी पत्र पाठविले जानार नाही व अर्जदारांना मुलाखतीस स्वखर्चाने १ तास अगोदर सर्व मुळ प्रमाणपत्रांसह उपस्थीत रहावे लागेल.
  ५. आरक्षीत उमेदवार उपलब्ध न झाल्यास नियमानुसार उपलब्ध उमेदवारा मधुन निवड करण्यात येईल.
  ६. निवड झालेल्या उमेदवारास संबंधित विभाग प्रमुखाच्या आदेशानुसार काम करणे बंधनकारक आहे.
  ७. निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्विकारण्यापुर्वी एक महिण्याचे मानधन रक्कम अनामत म्हणुन रोखा विभागात जमा करुन प्राप्त पावतीची नोंद विद्यार्थी विभागात करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम नियुक्ती कालावधी समाप्त झाल्यावर अथवा पदाचा राजिनामा १ महिण्याची पुर्वसुचना देवुन दिला असल्यास मिळु शकेल. एक महिणा आगावु नोटीस न देता पदाचा राजिनामा दिल्यास अनामत रक्कम सरकारजमा करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.
  ८. सदर जाहिरातीत बदल करण्याचे तसेच निवड समितीमार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे, प्रलंबीत ठेवण्याचे, नियुक्ती रदद करण्याचे अथवा सदर जाहिरात रदद करण्याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.
- नियुक्ती प्रक्रिया:-
  १. प्रथम प्राधान्य या वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर / पदविका उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.
  २. द्वितीय प्राधान्य या वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. तसेच महाराष्ट्र राज्यातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन पदव्युत्तर / पदविका उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.

३. तृतीय प्राधान्य हे महाराष्ट्र राज्यातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व या वैद्यकीय महाविद्यालयातुन पदव्युत्तर / पदविका उतीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.
४. चतुर्त प्राधान्य हे महाराष्ट्र राज्यातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर / पदविका उतीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.
५. पाचवे प्राधान्य हे महाराष्ट्र राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर / पदविका उतीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.
६. सहावे प्राधान्य हे महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर / पदविका उतीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.
७. सातवे प्राधान्य हे महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातुन एम.बी.बी.एस. व पदव्युत्तर / पदविका उतीर्ण झालेल्या उमेदवारास दिला जाईल.

- आरक्षीत पदाकरीता अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते पद दुस-या आरक्षीत उमेदवारास नियमानुसार देण्यात येईल त्यानंतरही आरक्षीत उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते पद खुला उमेदवारास देण्यात येईल. यानंतर रिक्त असलेली पदे सरळ मुलाखतीने भरल्या जातिल.
- रोखपाल यांचेकडे रुपये १००/- भरल्यानंतर विद्यार्थी विभागातुन अर्ज मीळेल.
- सदरहू जाहिरात या महाविद्यालयाच्या वेबसाईट www.vngmcytl.org.in यावर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता
श्री व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
यवतमाळ

प्रति,
१.सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, श्री व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.
२.सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
--------------------------------
--------------------------------
--------------------------------
३.नोटीस बोर्ड
४.निवासी वसतीगृह, नोटीस बोर्ड.
५.ग्रंथालय